# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर

| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli, Latur – 413512 |
|---|---|---|
| **EE/CGRF/LTR/ 119** | | **Date :- 01.08.2019** |

**ग्राहक तक्रार क्र.** : ०६/२०१९
**तक्रार दाखल दिनांक** : ०७.०६.२०१९

**प्रति,**

**१. मे. इंडस टॉवर्स लि.**
२०१०, ई-कोर, दुसरा मजला,
मार्वल एज, विमान नगर, पूणे - ४११०१४.

**२. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
अति-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, परळी (वै)

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. ०६/२०१९ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन मे. इंडस टॉवर्स लि, यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**
१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**
१) अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, बीड
२) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, बीड
३) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, अंबाजोगाई

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

**ग्राहक तक्रार क्रमांक : ०६/२०१९ ( दाखल दिनांक : ०७.०६.२०१९ )**

**मे. इंडस टॉवर्स लि.**

**२०१०, ई-कोर, दुसरा मजला,**

**मार्वल एज, विमान नगर, पूणे - ४११०१४.** **--ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**अति-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, परळी (वै)** **-- गैरअर्जदार**

| | | | |
|---|---|---|---|
| **कोरम :** | **श्री. पंडितराव बी. मोरे** | **:** | **अध्यक्ष** |
| | **श्री. सुधीर भाऊराव देशमुख** | **:** | **सदस्य** |
| | **श्री. जी. एन. गायकवाड** | **:** | **सचिव** |

## निकाल

**दि. ०१.०८.२०१९**

१) ग्राहक अर्जदार, "मे. इंडस टॉवर्स लि. " २०१०, ई-कोर, दुसरा मजला, मार्वल एज, विमान नगर, पूणे. (ग्राहक क्र. ५८९०६०३२८०७६) यांनी त्यांची तक्रार 'अ' फॉर्ममध्ये दि. ०७.०६.२०१९ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे. त्यानुसार ग्राहकाचे असे म्हणणे आहे की, त्यांची अनामत ठेव रक्कम रु. १६६६०/- त्यांना परत देण्यात यावी.

२) गैर अर्जदार महातिरण तर्फे श्री. नितीन निवृत्तीराव थिटे, अति-कार्यकारी अभिंयता, उपविभाग, परळी, यांनी आपली बाजु अशी मांडली की, सदर ग्राहकाची विज जोडणी दि. ०७.१२.२००४ रोजी झाली होती व जोडलेला विद्युतभार १२ केव्हीए इतका होता. ग्राहकाचे वीज जोडणी जानेवारी २०१६ मध्ये बंद करण्यात आले होते. ग्राहकाचा अनामत रक्कम परत मिळणे बाबतचा अर्ज दि.०३.१०.२०१८ रोजी प्राप्त झाला होता. परंतु ग्राहकाकडे विजजोडणी बंद करतेवेळेस रु. ४८१६०.१५/- इतकी थकबाकी होती. व कंपनीच्या नियमानुसार माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये अनामत रक्कम रु. १६६६०/- त्यांच्याकडील थकबाकी समायोजित करण्यात आली. व त्यानंतर ग्राहकाकडे एकूण थकबाकी रु. ३२५३०/- आहे. (पुरावा १ CPL, पुरावा २ चालू महिन्याचे बिल) ग्राहकाची अनामत रक्कम थकबाकी मध्ये समायोजित केली असल्याने अनामत रक्कम परत करणे शक्य नाही.

३) ग्राहकाच्या CPL वरुन त्यांना LT ५ B१ (औद्योगिक) दरा नुसार विजबिल आकारल्याचे दिसुन येते. परंतु Tarrif order दि. ०३.११.२०१६ व चालु परिपत्रक ३११ दि. ०१.१०.२०१८ (पुरावा ३)

नुसार मोबाईल टॉवरसाठी LT २ (व्यापारी) दराने विज आकारणी करणे बाबत सुचना आहेत. परंतु परिपत्रक क्रं. २७७६६ दि. १४.११.२०१७ नुसार मा. ए.पी.टी.एल. च्या अंतरीम आदेशानुसार मोबाईल टॉवर धारकास LT २ दराने विज आकारणी केली असली तरी औद्योगिक दराने विजबिल भरुन घेण्याबाबत सुचना दिलेले आहेत. व LT २, LT ५ दरामधील फरकाची रक्कम मा. ए.पी.टी.एल. यांच्या अंतिम आदेशानुसार देणे / घेणे बाबत निर्णय घेण्यात येणार आहे. त्यामुळे व अनामत रक्कम यापूर्वीच समायोजित केली असल्यामुळे अनामत रक्कम परत करणे शक्य नाही.

## आदेश

१) ग्राहक अर्जदाराची 'अ' फॉर्म मधील तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

२) ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय अमान्य असल्यास मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत 'ब' फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करु शकतात. फॉर्म 'ब' या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल

महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,

प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,

नागपूर-४४००१३.

दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८

ठिकाण : - लातूर

दिनांक :-०१.०८.२०१९

1.8.19 | 1-8-19 | 1/8/19
--- | --- | ---
अध्यक्ष | सदस्य | कार्यकारी अभियंता/सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर.